**Newspaper: Maharashtra Times**

**Article Date: 03rd April 2018**

**Article regarding 50th Youth Fest Celebration**

फोटो - विनय राऊळ

# चॅम्पियन्स

**युवा महोत्सवाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये झळाळती कामगिरी करून दाखवत पोदार कॉलेजनं ओव्हरऑल चॅम्पियनशीपचा मान पटकावला आहे. महोत्सवाच्या बहुतांश स्पर्धांमध्ये विजेतेपद पटकावत, मानाच्या समजल्या जाणाऱ्या 'मटा करंडका'वरही पोदारनं नाव कोरलं.**



## युवा महोत्सवाच्या ओव्हरऑल चॅम्पियनशीपचा मान पोदारला

पोदार कॉलेजचे व्हाइस प्रिन्सिपल एस. नटराजन आणि सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. वृषाली कणेरी विद्यार्थ्यांसह 'मटा करंडक' उंचावताना...


मुंबई टाइम्स टीम
muntainbox@gmail.com




माटुंग्याच्या पोदार कॉलेजनं चमकदार कामगिरी बजावत युवा महोत्सवाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात ओव्हरऑल चॅम्पियनशीपचा मान पटकावला. गेल्या पन्नास वर्षांत पोदार कॉलेजनं सर्वाधिक, म्हणजे वीसहून अधिक वेळा ओव्हरऑल चॅम्पियनशीप मिळवली आहे. या यशामागे प्रिन्सिपल, प्रोफेसर्स, शिक्षकेतर कर्मचारी यांचा मोलाचा वाटा असल्याचं विद्यार्थी आवर्जून सांगतात. झोनल चॅम्पियनशीप, म्युझिक, थिएटर ट्रॉफी, सुधीर यार्दी चषक, सर्वोत्कृष्ट अभिनेता, मिस्टर युनिव्हर्सिटी यांसारखे पुरस्कार मिळवतं पोदारच्या विद्यार्थ्यांनी सुवर्णभरारी घेतली आहे.

कलाक्षेत्रात विजयाची मोहोर उमटवत असतानाच पोदारचे विद्यार्थी अभ्यासात कुठेही मागे पडत नाहीत. संघांतले बहुतांश विद्यार्थी पदवी शिक्षणाबरोबर सीएस, सीएस तर काही मॅनेजमेंट कोर्सही करत आहेत. रोजचा अभ्यास आणि स्पर्धेसाठी तालमीच्या वेळेची योग्य सांगड ते घालतात. परीक्षेच्या काळात स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रोफेसर्स रेमिडियल लेक्चर्सही घेतात. त्यामुळेच विद्यार्थ्यांना परीक्षेत 'ओ' ग्रेड मिळवला आहेत.

### कशी होते तयारी?

जूनमध्ये कॉलेज सुरू झाल्यावर सीनिअर्स मंडळी पहिल्या वर्षाच्या पदवीच्या विद्यार्थ्यांची विविध स्पर्धांसाठी निवड करून संघ बांधणी करतात. प्रत्येक इव्हेंट्सचा संघ तयार झाल्यावर त्यात राखीव विद्यार्थ्यांनाही तयार केलं जात. कॉलेजच्या व्यवस्थापन विभागापासून ते परीक्षा विभागापर्यंत सर्वांचं विद्यार्थ्यांच्या तयारीवर लक्ष असतं. विद्यार्थ्यांना काय हवं-नको त्याची काळजी कॉलेज प्रशासन घेत असतं. विशेष म्हणजे स्पर्धेच्या काळात विद्यार्थी तालमीसाठी दिवसभर कॉलेजमध्ये असतात. तेव्हा कॉलेजच्याच जंगम मावशी त्यांना घरगुती नाश्ता, जेवण देतात. स्पर्धा जवळ आली की तालमीसाठी वेळ काढून प्राध्यापक स्वतः विद्यार्थ्यांबरोबर उशिरा कॉलेजमध्ये थांबतात. शशीकांत खांडेकर हे शिपाईमामा विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर लक्ष ठेवून असतात, असं कॉलेजच्या सांस्कृतिक समन्वयक प्रा. वृषाली कणेरी सांगतात.



गेल्या पन्नास वर्षांत मुंबई विद्यापीठातल्या अनेक विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली आहे. ही कामगिरी करताना विचारांचा कर्तृत्ववान असा वारसा निर्माण केला आहे. विद्यार्थ्यांचं कौतुक करावं तितकं कमी आहे. 'मटा'कडून मिळणारं पाठबळ विद्यार्थ्यांना नेहमीच उत्साहवर्धक ठरत आलं आहे.

– डॉ. देवानंद शिंदे
(कुलगुरू, मुंबई विद्यापीठ)



विजयाचा आनंद तर आहेच. पण त्याहून अधिक आनंद या गोष्टीचा आहे, की या निमित्तानं विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतोय. अभ्यासाबरोबर विविध कला प्रकारांमध्येही पोदारचे विद्यार्थी पुढे आहेत. 'महाराष्ट्र टाइम्स'सारखं मोठं वृत्तपत्र विद्यार्थ्यांच्या पाठीशी असल्यामुळे त्यांचं यश लाखो लोकांपर्यंत पोहोचतं.

– शोबना वासुदेवन, प्रिन्सिपल